Maharashtra State
Board of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional
Board

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च
माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर - ४१६ ००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.

क्र.कोविमं./माध्य.परीक्षा/ 1679
कोल्हापूर-००४
दिनांक १४/०८/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा
सातारा, सांगली,कोल्हापूर

विषय: माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु./मार्च २०२५ परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट (अर्ज क्र.१७) होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नावनोंदणी प्रक्रियेबाबत.

संदर्भ:१. क्र.रा.मं./परीक्षा -३/३२०३ दिनांक १२/०८/२०२४ रोजीचे पत्र
२. क्र.रा.मं/ले-पे ०६/परीक्षा शुल्क २०२४-२५/१७८८ दि.३०/०४/२०२४
३.क्र.रा.मं/परीक्षा-३/३२५१ दि.१४/०८/२०२४ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु./मार्च २०२५ परीक्षेसाठी खाजगीरित्या प्रविष्ट (अर्ज क्र.१७) होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन नांवनोंदणी अर्जाबाबतची कार्यवाही दिनांक १३/०८/२०२४ पासून सुरु करण्यात येत असून सदरील अर्ज मंडळाच्या **http://www.mahahsscboard.in** संकेतस्थळावरुन भरावयाचे आहेत.

यापूर्वी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नावनोंदणी केल्यानंतर त्यांचे अर्ज व इतर कागदपत्रांच्या मूळ प्रती विभागीय मंडळाकडे जमा करण्यात येत होत्या. तथापि फेब्रु/मार्च २०२५ च्या परीक्षेपासून सदर कार्यपध्दतीत बदल करण्यात आला असून विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज व मूळ कागदपत्रे शाळेमध्ये जमा करावयाची आहेत. सुधारित कार्यपध्दतीबाबतच्या सूचना या पत्रासोबत जोडण्यात आलेल्या असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी तसेच आवश्यक त्या सूचना आपल्या स्तरावरुन संबंधित विद्यार्थी, पालक यांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर

प्रत माहितीस्तव-
१.मा.सचिव ,राज्यमंडळ,पुणे

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.
## इ.१० वी साठी खाजगी विद्यार्थी म्हणून नांवनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी सूचना

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी /मार्च २०२५ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांची (फॉर्म १७) ऑनलाईन नावनोंदणी दिनांक १३/ ०८/ २०२४ पासून सुरू करण्यात येत आहे.

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी खाजगीरीत्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मार्च २०२४ परीक्षेपासून संपर्क केंद्र बंद करून सर्व माध्यमिक शाळांमधून फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे तरी इ.१० वी परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थ्यांकरिता सर्व माध्यमिक शाळा मंडळाच्या अटी / शर्तीनुसार नाव नोंदणी करण्याकरता उपलब्ध आहेत.

सबब सर्व माध्यमिक शाळांनी याची नोंद घेऊन शिक्षण प्रवाहाच्या बाहेर राहिलेल्या परंतु किमान इयत्ता पाचवी उत्तीर्ण असलेल्या मुला मुलींना माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट होऊन शिक्षण प्रवाहात येण्याची संधी उपलब्ध करून द्यावी या संदर्भातील सर्व माहिती व मार्गदर्शक सूचना मंडळाच्या **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

१. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु/मार्च २०२५ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी नांवनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आल्या आहेत.

| अ.क्र. | तपशील | नांवनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या तारखा |
|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाईन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नांवनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत जमा करणे. | मंगळवार दि.१३/०८/२०२४ ते सोमवार दि.३०/०९/२०२४ |
| २. | विद्यार्थ्यांनी विलंब शुल्काने नांवनोंदणी अर्ज व शुल्क ऑनलाइन भरुन अर्जाची प्रत (print out), ऑनलाईन नांवनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंटआऊट व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळेत जमा करणे. | मंगळवार दि.०१/१०/२०२४ ते बुधवार दि.३०/१०/२०२४ |

२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१०वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पद्धतीनेच भरावयाचे आहेत त्यामुळे कोणाचाही ऑफलाइन अर्ज स्वीकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१०वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन भरण्यापूर्वी शाळेतून मंडळाची परीक्षा द्यावयाची आहे ,त्या शाळेत जाऊन शाळेच्या सांकेतांक, विषय योजना , माध्यम व इतर आवश्यक माहिती घेऊनच नावनोंदणी करावी.

४. इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी नावनोंदणी अर्ज करतानाविद्यार्थ्यांनी **http://www.mahahsscboard.in** या संकेतस्थळावरील student corner या ऑप्शनचा वापर करावा , अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/ इंग्रजी मधून उपलब्ध आहेत, त्या वाचून अर्ज भरण्यास सुरुवात करावी

५. विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरिता १. शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत ) ,नसल्यास द्वितीय प्रत व प्रतिज्ञापत्र २. आधार कार्ड ३. स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो स्वतः जवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर मूळ कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत. काही कारणास्तव विदयार्थ्यांकडे दुय्यम शाळा सोडल्याचा दाखला असेल तर त्याची मूळ प्रत जोडणे आवश्यक 'आहे.

६. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर /मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो (pdf) काढून ती अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

७. संपूर्ण अर्ज भरून झाल्यावर अर्जाबाबतची संपूर्ण माहिती तसेच त्याने अपलोड केलेली सर्व मूळ कागदपत्रे त्याचे लॉगिन मध्ये उपलब्ध राहतील सदर अर्जाची प्रत (print out) विद्यार्थ्यांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या ई-मेल आयडीवर पाठवली जाणार आहे तसेच विद्यार्थ्यांनी या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंट आऊट ,ऑनलाइन शुल्क भरल्याची पावती व हमीपत्र या सह दोन प्रतीत (print out) काढून घ्यावीत

८. विद्यार्थ्यांनी अर्ज, ऑनलाईन नावनोंदणी शुल्क जमा केल्याबाबत पोचपावतीची प्रिंट आऊट व मूळ कागदपत्रे नावनोंदणी अर्जावर नमूद केलेल्या माध्यमिक शाळेत विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

९. खाजगी विद्यार्थी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालील प्रमाणे-

रू. १११०/- नाव नोंदणी शुल्क +रु.१००/- प्रक्रिया शुल्क (processing fee)

रु. १००/- विलंब शुल्क प्रति विद्यार्थी

१०. संबंधित शाळेने ऑनलाईन/ प्राप्त झालेल्या अर्जातील माहिती तसेच अपलोड केलेल्या सर्व मूळ कागदपत्रांच्या प्रती शाळेत जमा असल्याबाबतची खात्री करावी व त्याची पडताळणी करून माहिती / कागदपत्रे अपूर्ण (incomplete) असल्यास सदर अर्ज " अपूर्ण " (incomplete) या प्रकारे नोंदवून विद्यार्थ्याकडे त्रुटीपूर्ततेसाठी पाठवावयाचे आहेत तसेच इतर परिपूर्ण अर्ज व कागदपत्रे विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पाठवावयाचे आहेत व मूळ कागदपत्रे शाळेमध्ये ठेवावयाची आहेत.

११. सदरील काम करणाऱ्या शाळेतील मुख्याध्यापक/ज्येष्ठ शिक्षक व लिपिक यांना या कामाबाबत पुढील दराने मानधन देण्यात यावे-

अ) मुख्याध्यापक तथा ज्येष्ठ शिक्षक -

१) १० विद्यार्थ्यांपर्यंत- रु. १५०/-
२) १० पेक्षा जास्त विद्यार्थी - रु. १५०/- + रु. १०/- प्रति विद्यार्थी
३) जास्तीत जास्त - रु. ५००/-

ब) लिपिक
१) १० विद्यार्थ्यांपर्यंत- रु १००/-
२) १० पेक्षा जास्त विद्यार्थी- रु. १००/- + रु .१०/- प्रति विद्यार्थी
३) जास्तीत जास्त रु. २००/-

१२. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन पध्दतीने होणार असून नावनोंदणी करतांना विद्यार्थ्यांच्या सध्याच्या पत्त्यातील (Current Address) जिल्हा, तालुका व त्याने निवडलेल्या माध्यमानुसार, त्यास माध्यमिक शाळांची यादी दिसेल, त्यामधील एका माध्यमिक शाळेची निवड विद्यार्थ्याने करावयाची आहे. या माध्यमिक शाळेने विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज, प्रकल्प अंतर्गत मूल्यमापन, प्रात्यक्षिक/तोंडी, श्रेणी विषय संदर्भातील कामकाज व अनुषंगिक मूल्यमापन तसेच पुढील कार्यवाही करावयाची आहे व यासंदर्भातील गुण online पध्दतीने नोंदवून मंडळाकडे विहीत मुदतीत पाठवावयाचे आहेत व सदरचे गुणतक्ते प्रचलित पध्दतीप्रमाणे सिलबंद पाकिटात, पाकिटावर माध्यमिक शाळेचे नाव, सांकेतांक क्रमांक (index no.) टाकून विभागीय मंडळाकडे जमा करावयाचे आहेत.

१३. स्वाध्याय पुस्तिका ऑनलाईन पध्दतीने मंडळाच्या संकेतस्थळावर सरावासाठी इंग्रजी, मराठी, हिंदी व उर्दू माध्यमात उपलब्ध होतील. याबाबत संबंधित विद्यार्थ्यांना शाळेचे मुख्याध्यापक/ विषय शिक्षकांकडूनच सूचना व मार्गदर्शन देणेबाबत सूचित करावे. स्वाध्याय पुस्तिका ऑफलाईन पध्दतीने देण्यात येणार नसल्याने स्वाध्याय पुस्तिका सोडवून त्या तपासणे व त्याचे गुण कळविणे ही पध्दत बंद करुन नियमित विद्यार्थ्यांप्रमाणे खाजगी विद्यार्थ्यांची तोंडी, प्रात्यक्षिक, श्रेणी व अंतर्गत मूल्यमापनाची परीक्षा घेऊन या परीक्षांचे गुण online पध्दतीने नोंदवून विहीत मुदतीत विभागीय मंडळाकडे सादर करणे आवश्यक असल्याचे शिक्षकांना सूचित करावे.

१४. शाळा सोडल्याचा दिनांक व दाखला दिल्याचा दिनांक याबाबत पात्रतेसाठी शाळा सोडल्याचा दिनांक ग्राहय धरण्यात यावा. दि. ३० जून पूर्वी विद्यार्थ्यांचा शाळा सोडल्याचा दाखला असणे आवश्यक आहे व दि. १ जुलै रोजी कोणत्याही मान्यता प्राप्त माध्यमिक शाळेच्या हजेरी पटावर त्याचे नाव असणार नाही.

१५. इ. १०वी फेब्रु / मार्च २०२५ परीक्षेसाठी खाजगी विद्यार्थी (फॉर्म नं. १७) नावनोंदणी शुल्क ऑनलाईन पध्दतीने (Debit Card/Credit Card/UPL/Net Banking द्वारे) भरणे अनिवार्य राहील. ऑनलाईन पध्दतीने शुल्क जमा केल्याबाबतची पोचपावती विद्यार्थ्याला/संबंधित शाळेस त्यांच्या Login मध्ये प्राप्त होईल.

१६. एकदा नावनोंदणी अर्ज शाळेला ऑनलाईन सादर केल्यानंतर कुठल्याही स्तरावर त्रुटी पुर्ततेसाठी सदर अर्ज विद्यार्थ्यांस प्राप्त झाल्यास विद्यार्थ्याला त्याचे नाव, त्याचा सध्याचा पत्ता (Current address) माध्यम, शाळा यामध्ये कुठलाही बदल करता येणार नाही.

१७. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हावयाचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या प्राधिकृत केलेल्या रुग्णालयाच्या प्रमाणपत्राची / UDID Card ची छायाप्रत प्रमाणित करुन अर्जासोबत सादर करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना विषय योजना तसेच परीक्षेसाठी असलेल्या सवलती याबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

१८ महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळामार्फत इ. ५वी किंवा इ. ८वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इ. १०वी साठी खाजगी विद्यार्थी (१७ नं.) म्हणून नावनोंदणी करता येईल.

१९. पात्र (Eligible) विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे मंडळाने विहीत केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह त्याच शाळेतून भरणे आवश्यक

असल्याबाबतची सूचना विद्यार्थ्यांना माध्यमिक शाळेमार्फत करुन द्यावी व आवेदनपत्रे भरल्यानंतर संबंधित विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे त्यांना परत करण्यात यावीत.

२०. ज्या शाळेमधून विद्यार्थी परीक्षेचे आवेदनपत्र भरणार आहे त्याच माध्यमिक शाळेमार्फत आवेदनपत्र संदर्भातील अनुषंगिक कागदपत्रे जमा करण्यात यावीत.

२१. माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेसाठी प्रत्येक शाळेने आपल्याच शाळेतील माजी विद्यार्थी, आपल्याच गावातील विद्यार्थी किंवा सध्याच्या पत्त्यानुसार नजीकच्या परिसरातील विद्यार्थी यांचेच नावनोंदणी अर्ज प्रवेशित क्षमतेच्या मर्यादित (५० विद्यार्थी) स्वीकारावेत. तसेच ज्या शाळा आपल्या माजी विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज स्वीकारत नाहीत अशा शाळांची तक्रार प्राप्त झाल्यास त्या शाळांविरुध्द कारवाई करण्यात येईल.

२२. प्रथम नावनोंदणी केलेल्या ५० विद्यार्थी क्षमतेपेक्षा जास्त म्हणजे ५१ ते १०० विद्यार्थी क्षमतेसाठी संबंधित शाळांनी परवानगी घेणे आवश्यक आहे. याबाबत ५० ची क्षमता वाढविणेसाठी विभागीय मंडळाने संबंधित माध्यमिक शाळेची लेखी मागणी आल्यानंतर प्रकरणिका सादर करुन विभागीय अध्यक्षांची मान्यता घेऊन अंतिम मान्यतेसाठी पत्राद्वारे सचिव, राज्य मंडळ, पुणे-४ यांना सादर करणे आवश्यक आहे. तद्नंतर वाढीव मर्यादा मान्य करण्यात येईल. सदरची ही वाढीव मर्यादा या परीक्षेसाठी अंतिम असेल यानंतर विद्यार्थी क्षमता वाढविता येणार नाही, याची नोंद घ्यावी.

(सुभाष रा.चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर